# Financial Sustenance of farmers with Jowar

**Lokmat**

# ज्वारीच्या पिकाने शेतकऱ्यांची आर्थिक सुबत्ता वाढविणार



- डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीचा पुढाकार
- प्रत्येक शेतकऱ्याला दोन हजारांचे अनुदान
- डोरलीत ५० एकरांवर ज्वारीचा पेरा

वर्धा, दि.१४ (शहर प्रतिनिधी)- परंपरागत शेती व पिकांकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरविली आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती हलाखीची होण्यास हे सुद्धा एक कारण आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना ज्वारीच्या पिकाकडे वळवून आर्थिक सुबत्ता वाढवावी यासाठी डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीने पुढाकार घेतला आहे. ज्वारीचे उत्पादन वाढविण्यासाठी जिल्ह्यात एक कार्यक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती सोसायटीचे डॉ.सतीश यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

या सोसायटीने आतापर्यंत देशात १५१ गावांत हा प्रयोग केला आहे. यात त्यांना यश आले असून त्यांनी आत्महत्याग्रस्त विदर्भात ही योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी सोसायटीने डोरली या गावाची निवड केली आहे. या गावातील ५० शेतकऱ्यांनी ५० एकर जमिनीवर ज्वारीचा पेरा केला आहे. यातून मिळणाऱ्या उत्पादनावर शेतकऱ्यांचाच अधिकार राहणार असून निघणाऱ्या ज्वारीच्या मोबदल्यातून पेऱ्यासाठी दिलेले अनुदान परत करावयाचे आहे. यातून निघणारे उत्पादन शेतकरी गावात किंवा बाजारात विकू शकतात. याच ज्वारीतून पुन्हा पेरा करून ते उत्पादन घेऊ शकतात.

५० एकरातून जवळपास ५० हजार क्विंटल धान्याचे उत्पन्न होऊ शकते. हे धान्य गावातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी गावात महिला मंडळ स्थापन करण्यात येणार आहे. या मंडळाच्या माध्यमातूनच उत्पादनाची देखरेख करण्यात येणार असल्याचे गावच्या सरपंचांनी सांगितले.

ज्वारीचे पीक हे पारंपरिक असून ते खाण्याच्या, चाऱ्याच्या, आरोग्याच्या व पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य असल्याची माहिती त्यांनी दिली. यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणारी जमीन त्यांच्या आत्महत्या रोखण्यास मदत करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**शासनाने योजनेस मदत द्यावी**

ज्वारीच्या पिकाचे माहेरघर असलेल्या सोलापुरात मक्याचे पीक घेण्यासाठी शासनाच्या वतीने चार हजार रुपयांचे अनुदान दिले जात आहे. हा शासनाचा ज्वारीचे पीक कमी करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप शेतकरी नेते विजय जावंधिया यांनी या वेळी केला. मक्याच्या पिकाप्रमाणेच शासनाने ज्वारीच्या पिकालाही अनुदान द्यावे, अशी मागणी त्यांनी या वेळी केली.